# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक : 05.10.2026** **वार : सोमवार**

---

## ठळक बातम्या

1. गुंतवणूकदारांचा भरवसा आणि विश्वास मिळवल्याशिवाय देशाची प्रगती होऊ शकत नाही; उपराष्ट्रपतींचं प्रतिपादन.
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि स्वित्झर्लंडचे राष्ट्राध्यक्ष गाय पार्मेलिन आज द्विपक्षीय चर्चा करणार.
3. भारत आणि कॅनडा यांच्यातील प्रस्तावित करारासाठीच्या चर्चेची पाचवी फेरी आज ओटावामध्ये सुरू होणार.
4. आशियाई क्रीडा स्पर्धाची सांगता; पुढील स्पर्धा कतारमध्ये होणार.

## सविस्तर बातम्या

### उपराष्ट्रपती

गुंतवणूकदारांचा भरवसा आणि विश्वास मिळवल्याशिवाय देशाची प्रगती होऊ शकत नाही असं प्रतिपादन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं. नवी दिल्लीत काल इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरी ऑफ इंडियाच्या 58 व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. विकसित भारत घडवण्यासाठी बळकट संस्था, उद्योगांचं पाठबळ आणि चांगलं प्रशासन हे भौतिक आणि डिजिटल पायाभूत सुविधांइतकेच महत्त्वाचं असल्याचं उपराष्ट्रपतींनी सांगितलं. कॉर्पोरेट क्षेत्रातील पारदर्शकता, गुंतवणूकदारांचा विश्वास आणि जागतिक अर्थव्यवस्थेतील भारताचं स्थान बळकट करण्यात कंपनी सेक्रेटरी या व्यवसायाने महत्त्वाची भूमिका बजावली असल्याचे गौरवोद्गार उपराष्ट्रपतींनी यावेळी काढले.

### द्विपक्षीय चर्चा

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि स्वित्झर्लंडचे राष्ट्राध्यक्ष गाय पार्मेलिन यांच्यात आज नवी दिल्लीत द्विपक्षीय चर्चा होणार आहे. राष्ट्राध्यक्ष पार्मेलिन तीन दिवसांच्या भारताच्या दौऱ्यावर असून त्यांच्या समवेत वरिष्ठ अधिकारी आणि व्यावसायिक नेत्यांचा समावेश असलेले उच्चस्तरीय शिष्टमंडळ आहे. या बैठकीत उभय नेते, व्यापार आणि गुंतवणूक, विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष, वाहतूक, संस्कृती आणि लोकांमधील संपर्क यासह विविध क्षेत्रातील द्विपक्षीय सहकार्यातील प्रगतीचा आढावा घेतील तसंच, प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवर विचार-विनिमय करतील. राष्ट्राध्यक्ष पार्मेलिन आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू तसंच परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांची देखील भेट घेणार आहेत.

### भारत कॅनडा सीइपीए

भारत आणि कॅनडा यांच्यातील प्रस्तावित सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करारासाठीच्या चर्चेची पाचवी फेरी आज कॅनडातील ओटावा इथं होणार आहे. ही चर्चा पाच दिवस सुरु राहणार असून यावर्षाअखेर कराराला अंतिम स्वरुप देण्याचा दोन्ही देशांचा उद्देश आहे.

या वर्षी मार्च महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्ने यांनी दोन्ही देशांमधील करारासंदर्भातच्या चर्चा या वर्षात पूर्ण करण्याचं उद्दीष्ट जाहीर केलं होतं. तसंच उर्जा आणि दुर्मिळ खनिज क्षेत्रात भागीदारी करण्यालाही सहमती दर्शवली होती. हा करार, दोन्ही देशांमधल्या भागीदारीचा पाया ठरेल आणि 2030 पर्यंत द्विपक्षीय व्यापार 4 लाख 65 हजार कोटींवर नेण्यात सहायक ठरेल असा विश्वास दोन्ही नेत्यांनी व्यक्त केला होता.

**<u>पोट-निवडणूक प्रचार समाप्ती</u>**

तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि पश्चिम बंगालमधील पाच विधानसभा मतदारसंघ आणि आसाममधील एका लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठीचा प्रचार काल संपला. या सहा जागांसाठी उद्या, 6 तारखेला मतदान होणार आहे, तर शुक्रवारी, 9 तारखेला मतमोजणी होणार आहे. तामिळनाडूतील मदुरंतकम आणि धारापुरम, पुद्दुचेरीतील थट्टनचावडी आणि पश्चिम बंगालमधील रेजीनगर आणि नंदीग्राम या विधानसभा मतदारसंघात तर, आसाममध्ये नागाव लोकसभा मतदारसंघासाठी हे मतदान होणार आहे. तमिळनाडू, पुद्दूचेरी आणि पश्चिम बंगालमध्ये विद्यमान आमदारांच्या राजीनाम्यानंतर विधानसभेच्या जागा रिक्त झाल्या आहेत, तर आसाम मध्ये, काँग्रेस नेते प्रद्युत बोरदोलोई यांच्या राजीनाम्यानंतर नागांव लोकसभेची जागा रिक्त झाली आहे.

**<u>उत्तराखंड-राज्यसभा निवडणूक</u>**

उत्तराखंडमधील राज्यसभेच्या आगामी द्विवार्षिक निवडणुकीसाठी भाजपने दिनेश आर्य यांना पक्षाची उमेदवारी दिली आहे. तर, पश्चिम बंगालमधील राज्यसभेच्या पोटनिवडणुकीसाठी रुक्मिणी मल्लिक यांच्या नावाची घोषणा केली आहे. उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि पश्चिम बंगालमधील राज्यसभेच्या जागांसाठी या महिन्याच्या 16 तारखेला मतदान होणार आहे. या निवडणुकांमध्ये उत्तर प्रदेशातील 10 जागा, उत्तराखंडमधील एक जागा आणि पश्चिम बंगालमधील एका जागेसाठीच्या पोटनिवडणुकीचा समावेश आहे.

**<u>पदवीधर उमेदवार जाहीर</u>**

महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांसाठी भारतीय जनता पक्षानं काल उमेदवारांची घोषणा केली. पुणे पदवीधर मतदारसंघातून स्मिता जाधव यांना, पुणे शिक्षक मतदारसंघातून कौस्तुभ गावडे यांना; तर नागपूर पदवीधर मतदारसंघातून सुधाकर कोहळे यांना भाजपाकडून उमेदवारी देण्यात आली आहे. या निवडणुकीसाठी येत्या 23 ऑक्टोबरला मतदान होणार आहे. काँग्रेस पक्षाने यापूर्वीच तीन मतदारसंघांसाठी उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. या निवडणुकांसाठी पाचही मतदारसंघांत 23 ऑक्टोबर रोजी मतदान होणार असून, 27 ऑक्टोबर रोजी मतमोजणी केली जाईल.

**<u>इराण-होर्मुझ</u>**

होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा खुली करण्याबाबत आपली भूमिका काल इराणने स्पष्ट केली. यावर्षीच्या जून महिन्यात करण्यात आलेल्या अंतरिम करारात नमूद केलेल्या 7 अटी पूर्ण केल्याशिवाय सामुद्रधुनी पुन्हा उघडली जाणार नाही, असं इराणी संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बाकर कलिबाफ यांनी म्हंटलं असल्याचं ईराणच्या सरकारी प्रसारमाध्यमांनी सांगितलं. दरम्यान, अमेरिकेशी झालेल्या संघर्षानंतर इराण आपल्या क्षेपणास्त्रांची मारक क्षमता वाढवण्याचा प्रयत्न करणार असल्याचं, इराणच्या लष्कराचे प्रवक्ते मोहम्मद अक्रमिनिया यांनी सांगितलं.

**<u>पीएम-सेतु</u>**

कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयातर्फे राबवण्यात येणाऱ्या पीएम-सेतू योजनेला काल एक वर्ष पूर्ण झालं. गेल्या वर्षी 4 ऑक्टोबरला सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाचा उद्देश, देशातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था अर्थात आयटीआयचं, उद्योगांच्या गरजांशी सुसंगत अशा प्रशिक्षण संस्थांमध्ये रूपांतर करून, व्यावसायिक प्रशिक्षणाचा दर्जा आणि उपयुक्तता उंचावणं हा आहे. या योजनेसाठी एकंदर 60 हजार कोटी रुपयांहून अधिक तरतूद करण्यात आली असून, त्यात केंद्र सरकारचा 30 हजार कोटी रुपये, राज्य सरकारांचा 20 हजार कोटी रुपये आणि उद्योग क्षेत्राचा 10 हजार कोटी रुपयांचा सहभाग आहे.

**<u>मोर्चा</u>**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी मुंबईत काल विराट गर्जना मोर्चा काढण्यात आला. शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली काढलेल्या या मोर्चात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तसंच अन्य पक्षांचे नेते सहभागी झाले होते. राज्यातल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाची प्रक्रिया रद्द करावी, तसंच देशातल्या आगामी निवडणुका मतपत्रिकांवर घेतल्या जाव्यात, अशी मागणी मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी केली. दरम्यान, निवडणुका जिंकल्यावर काही न बोलता, हरल्यावर मात्र निवडणूक आयोगावर टीका करण्याच्या विरोधी पक्षांच्या दुटप्पी भूमिकेवर भाजप नेते आशिष शेलार यांनी टीका केली. ते काल मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते.

**एम.पी.एस.सी. आंदोलन**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी आंदोलन करणाऱ्या एमपीएससीच्या विद्यार्थ्यांशी सरकारनं तत्काळ संवाद साधावा, अशी विनंती ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केली आहे. ते काल पुण्यात वार्ताहरांशी बोलत होते. तर, एमपीएससीच्या विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत राज्य सरकार सकारात्मक असून, विद्यार्थ्यांनी आंदोलन स्थगित करावं, असं आवाहन केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत केलं.

**फेर तपासणी**

राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाकडून महाराष्ट्र शासनामार्फत सहकारी साखर कारखान्यांना देण्यात आलेल्या कर्जाच्या विनियोगाची फेरतपासणी करण्यात येणार आहे. यामध्ये राज्यातल्या सहा सहकारी साखर कारखान्यांनी घेतलेल्या 564 कोटी 54 लाख रुपयांच्या कर्जाचा वापर, ज्या कारणासाठी कर्ज मंजूर करण्यात आलं होतं, त्याच कारणासाठी झाला आहे का,याची पडताळणी केली जाणार आहे. साखर आयुक्त डॉक्टर संजय कोलते यांनी याबाबतच्या सूचना दिल्या आहेत.

**सेखों मॅरथॉन स्पर्धा**

देशभरातील विविध शहरांमध्ये काल 'सेखों' या मॅरथॉन स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं होतं. भारत-पाकिस्तान युद्धात असामान्य शौर्य गाजवणारे, परमवीर चक्र विजेते फ्लाइंग ऑफिसर निर्मल जीतसिंग सेखों यांच्या स्मरणार्थ भारतीय वायु सेनेतर्फे ही स्पर्धा आयोजित करण्यात येते. दिल्ली, मुंबई, पुणे चंदीगड, ग्वाल्हेर, बेंगळुरू, गुवाहाटी आणि जोधपूर या शहरांतील स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. भारतीय वायु सेना प्रमुख, एअर चीफ मार्शल ए पी सिंग यांनी नवी दिल्लीतील जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर या स्पर्धेला हिरवा झेंडा दाखवला.

**आशियाई क्रीडा स्पर्धा**

आशियाई क्रीडा स्पर्धा 2026ची जपानमधील आईची-नागोया इथे काल सांगता झाली. नागोया शहरातील मिझुहो पार्क ॲथलेटिक स्टेडियमवर हा समारोप सोहळा झाला. या समारोप सोहळ्यासाठी नेमबाज नीरू धांडा ही भारताची ध्वजवाहक बनली होती. 2030 साली दोहा मध्ये होणाऱ्या पुढील आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी मशाल आणि ध्वज कतारच्या प्रतिनिधींकडे यावेळी औपचारिकरित्या सुपूर्द करण्यात आला. भारताने 21 सुवर्ण, 27 रौप्य आणि 37 कांस्यपदकांसह 85 पदकांसह पदकतालिकेत चौथे स्थान पटकावले. तर, एकंदर 341 पदकांसह चीनने पदकतालिकेत अव्वल स्थान पटकावलं.

दरम्यान, आशियाई क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी भारतीय खेळाडूंचे, विशेषत: उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिला खेळाडूंचं अभिनंदन केलं आहे. ज्यांनी समर्पण आणि वचनबद्धतेने भारताचं प्रतिनिधित्व केलं, अशा भारतीय पथकातील प्रत्येक सदस्याचा देशाला अभिमान आहे असं राष्ट्रपतींनी आपल्या समाजमाध्यमांवरील संदेशांत म्हंटलं आहे. आपल्या संदेशात त्यांनी सर्व खेळाडूंना त्यांच्या क्रीडा प्रवासात सतत यश मिळवण्यासाठी आणि आणखी अनेक यशांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

**हवामान**

देशाच्या बहुतांश भागातून नैऋत्य मोसमी पाऊस माघारी परतला आहेत, तर, अन्य काही भागांतून मोसमी पाऊस माघारी जाण्यासाठीची अनुकूल स्थिति निर्माण झाली असल्याचं हवामान विभागाने सांगितलं आहे. दरम्यान, मुंबई, ठाणे, पालघर, रायगड आणि रत्नागिरीच्या काही भागांत येत्या 48 तासांत उष्ण अणि दमट हवामान राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. तर, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू आणि पुद्दुचेरी इथं मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**